मायणी तलाव व त्या परिसरातील गांवे व माण पूर्व भागातील १६ गावांना पिण्याच्या पाण्यासाठी व पशुधनासाठी कृष्णा नदीमधून टेंभू उपसा सिंचन योजनेतून पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी राबवावयाच्या योजनांच्या कामासाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक-एससीवाय-०७/२०१९/प्र.क.४४/म-११,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,
दिनांक:- १५ जुलै, २०१९.

वाचा:-

१) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एससीवाय-२०१८/प्र.क्र.३/म-७, दिनांक १७/०१/२०१८ व शुध्दीपत्रक दिनांक १६/०३/२०१८.

२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एससीवाय-२०१८/प्र.क्र.३/म-७, दिनांक १०/०७/२०१९.

प्रस्तावना :-

मायणी तलाव व त्या परिसरातील गांवे व माण पूर्व भागातील १६ गावांना पिण्याच्या पाण्यासाठी व पशुधनासाठी कृष्णा नदीमधून टेंभू उपसा सिंचन योजनेतून पाणी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने मायणी तलाव भरणेसाठी रुपये ४७२.८९ लक्ष व माण तालुक्याच्या पूर्व भागातील प्रस्तावित १६ गावांसाठी रुपये ४३२.३२ लक्ष ची कामे प्रगतीपथावर असून, झालेल्या कामांची देयके अदा करण्यासाठी योजनेच्या अंदाजपत्रकानुसार खटाव तालुक्यासाठी रुपये ४७२.८९ लक्ष व माण तालुक्यासाठी रुपये ४३२.३२ लक्ष इतक्या खर्चाची योजना राबविण्यासाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने मान्यता दिली. सदर निधी मदत व पुनर्वसन विभागाकडून टंचाई निधीतून विशेष बाब म्हणून देण्यास मा. मुख्यमंत्री महोदयांनी मान्यता दिली होती. त्यानुसार दिनांक १७/०१/२०१८ रोजी शासन निर्णय व दिनांक १६/०३/२०१८ रोजी शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात आले. सदर शासन निर्णयानुसार योजना कार्यान्वित करण्यासाठी प्रशासकीय मान्यता घेऊन खटाव तालुक्यासाठी रुपये ४७२.८९ लक्ष व माण तालुक्यासाठी रुपये ४३२.३२ लक्ष असे एकूण रुपये ९०५.२१ लक्ा इतका निधी दोन समान हप्त्यामध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल, असे नमूद केले होते. सद्य:स्थितीत दोन्ही योजनांची कामे ७५ टक्के पूर्ण झाल्यामुळे माण व खटाव तालुक्यासाठी मंजूर निधीपैकी तांत्रिक मान्यता प्राप्त निधीच्या ७५ टक्के रक्कम माण तालुक्यासाठी रुपये ३१३.०२ लक्ष व खटाव तालुक्यासाठी रुपये ३५२.९७ लक्ष असा एकूण ६६५.९९ लक्ष इतका निधी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास उपलब्ध करुन देण्याबाबत दिनांक १०/०७/२०१९च्या शासननिर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार रुपये ६६५.९९ लक्ष इतका निधी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास बीम्स प्रणालीद्वारे वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

मायणी तलाव व त्या परिसरातील गांवे तसेच माण पूर्व भागातील १६ गावांना पिण्याच्या पाण्यासाठी व पशुधनासाठी कृष्णा नदीमधून टेंभू उपसा सिंचन योजनेतून पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी राबवावयाच्या योजनांकरीता पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास एकूण रक्कम **रुपये ६६५.९९लक्ष (अक्षरी रुपये सहा कोटी पासष्ट लक्ष नव्वयाण्णव हजार फक्त)** इतका निधी ह्या शासन निर्णयान्वये अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर (BDS) उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. सन २०१९-२० या चालू वित्तीय वर्षात मागणी क्र.सी-६, २२४५, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य,०१,अवर्षण, १०२ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, (९२) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकाव्यतिरिक्त खर्च, (९२) (०१) पिण्याच्या पाण्याचा आकस्मिक निकडीचा पुरवठा (अनिवार्य),३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) (२२४५ २१८५)या उप लेखाशिर्षाखाली **रुपये ६६५.९९लक्ष (अक्षरी रुपये सहा कोटी पासष्ट लक्ष नव्वयाण्णव हजार फक्त)** इतका निधी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांना वितरीत करण्यात येत असून, तो त्यांनी उपरोक्त लेखाशिर्षाखाली अंतिमत: खर्ची टाकावा.

३. **<u>अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर उपलब्ध निधी अनावश्यक रितीने कोषागारात आहरीत करुन तो वाटपा अभावी बँकेत पडून राहणार नाही, याची काटेकोर दक्षता घेण्याचे आदेश वेळोवळी देण्यात आलेले आहेत. असे असतानाही कोषागारातून रक्कम आहरीत करुन बँकेत ठेवले असल्याच्या बाबी निदर्शनास आल्या आहेत. यास्तव निधी आहरीत करुन बँकेत ठेऊ नये अशा सक्त सूचना या शासन निर्णयान्वये पुनश्च: देण्यात येत आहेत. अशी बाब आढळून आल्यास त्याला तात्पुरता अपहार समजून, संबंधितांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.</u>**

४. सदर निधी ज्या प्रयोजनासाठी वर्ग करण्यात आला आहे, त्याच प्रयोजनासाठी त्याचा वापर होत आहे, याची पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने खातरजमा करावी व सदर निधी अन्य कालावधीतील उपाययोजनांसाठी व इतर बाबींवर खर्च होणार नाही, याची पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने दक्षता घ्यावी. वितरीत निधी स्वीय प्रपंजी लेखा खाते (Personal Ledger Account) अथवा बँक खात्यात न ठेवता तो कंत्राटदारांना थेट Electronic Clearing Services द्वारे वितरीत केला जाईल, या अटींच्या अधिन निधी वितरीत करण्यात येत आहे. तरी त्यानुसार पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने कार्यवाही करावी.

५. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने उपरोक्तप्रमाणे वितरीत करण्यात आलेल्या निधीचे पूर्ण विनियोजन झाल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र व योजनेचे काम पूर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने यापुढील उर्वरित २५ टक्के निधी मागणीबाबत कार्यवाही करावी.

६. निधी वाटपाचे लेखे, अभिलेखे/नोंदवहया विहित कार्यपध्दतीनुसार अनुदान आहरीत व वितरीत करणाऱ्या कार्यालयाच्या स्तरावर अदयावत ठेवण्यात याव्यात. तसेच झालेल्या खर्चाची, महालेखाकार कार्यालयात नोंदविण्यात आलेल्या खर्चाशी पडताळणी करुन त्याबाबतचे प्रमाणपत्र या विभागाकडे तात्काळ सादर करावे. तसेच कोणत्याही परिस्थितीत मंजूर निधीच्या मर्यादेपेक्षा जास्त खर्च होणार नाही, याची दक्षता नियंत्रक अधिकाऱ्यांनी घ्यावी. वितरीत करण्यात आलेल्या अनुदानातून जर काही रक्कम खर्ची पडणार नसेल तर ती रक्कम विहित वेळेत शासनास प्रत्यार्पित करण्यात यावी.

७. सदर निधी जरी मदत व पुनर्वसन विभागाकडून अर्थसंकल्पीत करण्यात आला असला तरी सदर योजनेस पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने प्रशासकीय मान्यता दिली असल्यामुळे सदर निधीचे नियमातील तरतुदीनुसार कोटेकोरपणे लेखापरीक्षण करण्याची जबाबदारी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाची राहील. तसेच यानुषंगाने विधीमंडळविषयक, महालेखापाल यांच्या लेखापरीक्षण / लोकलेखा समिती विषयक वा इतर कोणत्याही स्वरुपाचे कामकाज पुर्णत: पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने हाताळणे आवश्यक राहील. वितरीत करण्यात येत असलेल्या निधीचे लेखे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने स्वतंत्ररित्या ठेवावेत.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७१६१३१०३५२४१९ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJASHREE MILIND RAUT

Digitally signed by RAJASHREE MILIND RAUT
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=58e3cf7b9657c2ed6d6d47f01918bccb8dcaac1f1b6f31c7c723d b4deb16f5f2, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=6689500497ea8c2084eb7b303b8b2f3922ec7b73b6347d0 4e043dc0b8ef0fd64, ou=REVENUE AND FOREST, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=RAJASHREE MILIND RAUT
Date: 2019.07.16 13:19:54 +05'30'

(राजश्री राऊत)
वित्तीय सल्लागार व सह सचिव

प्रति,

१. मा.मंत्री (मदत व पुनर्वसन), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
२. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग),यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
३. मा.राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
४.मा. अपर मुख्य सचिव (पा. पु. व स्व.विभाग),मंत्रालय, मुंबई -३२,
५. मा. प्रधान सचिव, (जलसंपदा विभाग), मंत्रालय, मुंबई -३२,
६. मा. सचिव (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन), मंत्रालय, मुंबई-३२,
७. महालेखापाल १/२,(लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षण),महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.

८. विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे,

९. जिल्हाधिकारी, सातारा,

१०. संचालक, लेखा व कोषागारे,महाराष्ट्र राज्य, मुंबई-३२,

११. जिल्हा कोषागार अधिकारी, सातारा,

१२. वित्त विभाग (अर्थसं.-३/अर्थसं.-६/व्यय-९),मंत्रालय, मुंबई-३२,

१३. कार्यासन अधिकारी (ब-१/म-७), म.व व.वि.मंत्रालय, मुंबई ३२.

१४. निवडनस्ती, (कार्यासन म-११), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.